Impact Factor 2.147

ISSN 2349-638x

Refereed And Indexed Journal

# AAYUSHI INTERNATIONAL INTERDISCIPLINARY RESEARCH JOURNAL (AIIRJ)

Monthly Publish Journal

VOL-III ISSUE-XII Dec. 2016

Address
- Vikram Nagar, Boudhi Chouk, Latur.
- Tq. Latur, Dis. Latur 413512
- (+91) 9922455749, (+91) 9158387437

Email
- aiirjpramod@gmail.com

Website
- www.aiirjournal.com

CHIEF EDITOR – PRAMOD PRAKASHRAO TANDALE

# महिलांच्या समस्या व आव्हाने

**प्रा. गोपाळ हनुमंत बडगिरे**
जवाहरलाल नेहरु समाजकार्य माहाविद्यालय,
सिडको नांदेड

**प्रस्तावना**

मानवी जातीच्या इतिहासा इतकाच स्त्रियांच्या अत्याचाराचा, अन्यायाचा छळाचा इतिहास पुरातन आहे. पुरुषसत्ताक समाज व्यवस्था अस्तित्वात आली आणि स्त्रियांच्या स्वांतत्र्यावर गदा आली. पुरुष स्त्रिला ओळखून होता ती हुशार व सर्व क्षमता असलेली आहे त्या मुळे तिच्यावर बंधने लादली गेली व तिचे सर्व अधिकार सिमीत केले गेले. धर्माचा आधार घेऊन स्त्रिवर अनेक जाचक बंधने लादली गेली. नित्तीमत्ता व चारित्र्याची सर्व जबाबदारी स्त्रियांवर लादण्यात आली. त्यामुळे कुठल्याही अन्याय अत्याचाराचा बळी स्त्रियांच ठरल्या.

भारतात सर्वच ठिकाणी स्त्रियांना देवी म्हणुन पुज्य मानले पण स्त्रियांची परिस्थिती मात्र भिषण आहे. सध्याच्या संगणक युगामध्ये आधुनिक तंत्रज्ञानाच्या साह्याने स्त्रियांनी जन्मच घेऊ नये यासाठी प्रयत्न केले जात आहेत. म्हणुनच स्त्री ही मानव आहे हे वाक्य जरी नेहमीचेच वाटत असले तरी त्यामागे वास्तविकतेची भिषणता लपलेली आहे. तसेच महिलांना वेगवेगळ्या समस्यांना सामोर जावे लागते. महिलांच्या समस्या आणि आव्हानांची कारण मीमांसा करण्यासाठी हा लेख लिहिण्यात आला आहे.

**संशोधनाचे उद्दिष्ट्ये :**

१. स्त्री अध्ययनाची गरज समजून घेणे
२. स्त्रियांच्या सामाजिक समस्यांचे अध्ययन करणे
३. महिला सक्षमीकरण योजनांचे अध्ययन करणे.
४. स्त्रियांच्या शैक्षणिक व आरोग्य विषयक योजनाचे अध्ययन करणे.

**संशोधन पध्दती :**

प्रस्तुत शोधनिबंधाच्या अध्ययनासाठी प्रामुख्याने द्वितीयक तथ्यांचा आधार घेण्यात आला आहे. ही तथ्ये स्त्रियांच्या समस्या आणि आव्हाने याच्याशी संबंधीत ग्रंथ , पुस्तके, मासिके व इंटरनेट चा वापर करुन जमा करण्यात आली आहे.

**स्त्रियांची सामाजिक स्थिती :**

प्रत्येक समाजामध्ये काही अलिखीत नियम असतात. प्रत्येक समाजाने आपआपली सांस्कृतिक मुल्ये, रुढी, परंपरा विकसीत केलेल्या असतात. त्याच सर्व सामाजिक नियमामध्ये सर्वांना आपले जिवन जगावे लागते. भारतीय समाजाची निर्मिती ही पुरुषप्रधान आहे व सर्व नियम हे पुरुषांनीच बनवले आहेत. त्यामुळे स्त्रियांना समाजामध्ये दुय्यम स्थान मिळाले आहे. स्त्रि जीवनावर महत्वाचा

प्रभाव असणा-या महत्वाच्या संस्था म्हणजेच कुटूंब संस्था, विवाह संस्था, व धार्मिक परंपरा होय. स्त्रियांचे अधिकारी व त्यांची कर्तव्य या बाबतच्या समजातील स्त्रि- पुरुषांच्या कल्पनाना याच घटकांकडून वैचारिक व नैतिक आधार मिळतो. आधुनिक समाज व्यवस्थेत होत असलेल्या बदलामुळे सर्वच बाबतीत जलद बदल होत नाही स्त्रियांच्या बाबातीत मात्र पुरुषांची किंवा समाजाची मानसिकता मात्र कमी गतीने बदलताना दिसते. जागतिक आरोग्य संघटनेच्या पाहणी नुसार दर पाच स्त्रियां मागे एका स्त्रिला शारिरीक अथवा लैंगिक कारणाने छळा सोसावा लागतो. स्त्रियांवर कुटूंबात किंवा समाजात जे आत्याचार होतात त्याचा मुख्यत: तिच्या समाजिक आर्थिक, सांस्कृतिक व राजकिय, शैक्षणिक क्षेत्रातील दुय्यम दर्जाच कारणीभुत आहे. भारतात दर हजार पुरुषामागे स्त्रियांचे प्रमाण ९२३ आहे . दर १०० मिनटांत एक हुंडाबळी जातो. दर २४ मिनिटात एक बलात्कार होतो. या सर्व प्रक्रियेत स्त्री, आर्थिक , शारिरीक , मानसिकदृष्ट्या शोषित होते. लिंगभेद व स्त्रि विरोधी दृष्टीकोन यामुळे स्त्रियांना दुरावस्थेस व अत्याचारास तोंड द्यावे लागते. भारतीय समाजात स्त्रियांना अनेक समस्यांना तोंड द्यावे लागते.

**हुंडाबळी :**

लग्नाच्या वेळी मुलीला हुंडा द्यावा लागतो समाजामध्ये व्यक्तीचा दर्जा त्याने मुलीच्या लग्नात किती खर्च केला. किती हुंडा दिला व घेतला यावरुन ठरत असतो. हुंड्याची समस्या स्त्रिभ्रुण हत्यांमध्ये असलेली दिसुन येते. भारतामध्ये प्रत्येक १०० मिनीटाला एक हुंडाबळी जातो. तसेच ७० टक्के महिलांना कौटूंबिक हिंसाच्याराला समोरे जावे लागते.

**बालविवाह :**

ग्रामीण भागामध्ये बालविवाहाची प्रथा प्रामुख्याने दिसुन येते ग्रामीण भागात जवळपास ६०टक्के विवाह लहान वयातच केले जातात. त्यामध्ये मुलींच्या संरक्षाचा मुख्य हेतु असतो. लग्न करुन देऊन आपल्या जबाबदारीतुन मुक्त होणे हा उद्देश असतो.

**स्त्री भ्रुणहत्या :**

भारतीय समाजात स्त्रिभ्रुण हे आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करुन गर्भावस्थेतच लिंग निदान करुन गर्भपात केला जातो. त्यामुळे स्त्री- पुरुष प्रमाणात फरक मोठ्या प्रमाणात दिसुन येतो. मुलींचा जन्मच नाकारला जातो महाराष्ट्रा ० ते ०६ वयोगटातील मुलामुलीचे प्रमाण १०००-८५६ आहे.

**कुपोषण :**

निम्न व मध्यमवर्गीय कुटूंबात स्त्री पुरुष लिंगभेदभाव केला जातो . मुळातचे आर्थिक उत्पन्न कमी असल्यामुळे पोषक आहार मुलांना देण्यात हे पालक असमर्थ ठरतात. त्यामुळे आज खुप मोठ्या प्रमाणात बालके कुषोषित होत आहेत.

**लैंगिक शोषण :**

भारतामध्ये दर सातव्या मिनीटाला एका मुलीला लैंगिक अत्याचाराला सामोरे जावे लगाते. महिलांवर कामाच्या ठिकाणी लैंगिक अत्याचार होण्याचे प्रमाण मोठे आहे. अशा प्रकारच्या अनेक सामाजिक समस्यांना महिलांना सामोरे जावे लागते.

**स्त्रियांचा शैक्षणिक दर्जा :**

स्त्रियांचे दुय्यम स्थान संपविण्यासाठी शिक्षण हे अत्यंत महत्वाचे साधन आहे. स्त्रियांना शैक्षणिक क्षेत्रातही अनेक समस्यांना सामोर जावे लागते. ग्रामीण भागात मुलींच्या शिक्षणाकडे दुर्लक्ष केले जाते. सामाजिक असुरक्षिततेची भावना, रुढी, प्रथा, परंपरा पगडा, अज्ञान, गरिबी, शिक्षणसाठी दुर परगावी जाणे आशा अनेक कारणामुळे शैक्षणिक स्वांतत्र्यावर गदा आणली जाते. आजहीह ब-याच ठिकाणी स्त्रिया या शिक्षणापासून वंचित दिसुन येतात मुलींच्या शिक्षणातील काही महत्वाच्या बाबी.

१. पहिली ते चौथीच्या वर्गात दर ३ मुलीमागे १ मुलगीशाळेत येत नाही मुलींच्या शाळा गळतीचे प्रमाण फार मोठे आहे. पहिलीतील १०० मुलीमागे ३० मुली पाचवीच्या वर्गात प्रवेश करतात.
२. ५ वी ते ८ वी या वर्गात दर ५ मुलीमागे एकच मुलगी शाळेत असते.
३. महाविद्यालयीन शिक्षणापर्यंत मुलींच्या गळतीचे प्रमाण फार मोठे आहे. तसेच तंत्र शिक्षणात मुलींची टक्केवारी ६ ते १७ टक्के एवढी आहे.

२०११ च्या जनगणनेनुसार ६५.४६ टक्के एवढेच स्त्रि साक्षरतेचे प्रमाण आहे.

**स्त्रियांच्या आरोग्य विषयक समस्या :**

महिलांच्या आरोग्य उत्तम राखण्याकरिता मुलीच्या वयाच्या वेगवेगळ्या अवस्थामध्ये त्यांना सुपोषण मिळणे आवश्यक असते. त्यांच्या आहाराकडे विशेष लक्ष देणे आवश्यक आहे. महिलांमध्ये सामान्य आरोग्य विषयक समस्या म्हणजे रक्ताक्षय, कुपोषण बालविवाहामुळे वारंवार लादली जाणारी बाळांतपण या दिसुन येतात. सांडपाणी उपलब्ध नसते, ग्रमीण भागात शौचालयये नाहीत, नाल्या नाहीत त्यामुळे स्त्रियांना अनेक आरोग्य विषयक समस्यंना सामोर जावे लागते.

**महिला सक्षमी करणाच्या योजना :**

भारतातील स्त्रियापुढे अनेक समस्या आहेत. आव्हाने आहेत. त्याकरिता शासनाने आनेक उपाययोजना केल्या आहेत. योजना राबविल्या आहेत

**सर्वशिक्षा अभियान :**

भारतातील ०६ ते १४ वयोगटातील सर्व मुलांना या योजनेच्या माध्यमातुन मोफत शिक्षण दिले जाते मुलींच्या गुणवत्ता पुर्ण शिक्षणावर भर दिला जातो.

**महिला वस्तीगृह :**

नौकरी करणा-या, एकट्या राहणा-या अविवाहित महिला, विधवा , घटस्पोटीत, विभक्त महिलांना या योजनेचा लाभ घेता येतो. त्या करिता महिलांचे मासिक उत्पन्न हे १६ हजार रुपयापेक्षा कमी असले पाहिजे. त्याकरिता महिला व बाल विकास अधिका-याशी संपर्क करावा लागतो.

**निर्वाह भत्ता अनुदान योजना :**

ही योजना राज्य पुरस्कृत असुन देवदासीसाठी ही योजना राबविली जाते. ४० वर्षावरील देवदासींना या योजनेचा लाभ घेता येतो. या योजनेने अंतर्गत पात्र स्त्रियांना ६०० रु महिना निर्वाह अनुदान देण्यात येते. तसेच देवदासी व तिच्या मुलीच्या विवाहासाठी अनुदान योजना राबवली जाते

**व्यक्तीगत सहाय्य :**

आर्थिकदृष्ट्या कमकुवत कुटूंबातील निराधार , परितक्त्या, विधवा महिलासाठी ही योजना आहे या योजना अंतर्गत छोटे व्यवसाय सुरु करण्यासाठी शासनाकडून आर्थिक अनुदान देण्यात येते. स्वत:च्या कुटूंबाला आर्थिक हातभार लावण्याच्य हेतूने शासन आर्थिक साह्य करते.

**स्वाधार योजना :**

निराश्रीत महिला, कैदी महिला, तसेच कुंटणखण्यातून मुक्त केलेल्या, लैंगिक शोषण व हुंडाग्रस्त, एचआयव्ही ग्रस्त महिलांना स्वाधार योजने अंतर्गत शासनाकडून अन्न, वस्त्र, निवा-याची सोय केली जाते ही योजना जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांच्या मार्फत राबविली जाते.

**किशोरी शक्ती योजना :**

या योजने अंतर्गत ११ ते १८ वर्ष वयोगटातील किशोर वयीन मुलीचे पोषण व आरोग्य विषयक दर्जा सुधारणे घरगुती व व्यवासायभिमुख प्रशिक्षण देऊन त्यांना अर्थार्जनासाठी सक्षम बनविणे आरोग्य पोषण कुटूंबकल्याण, गृहव्यवस्थापन, शिक्षण घेऊन त्यांना जागृत करणे, बालविवाहस प्रतिबंध करणे, आर्थिक परिस्थिती सुधारणे, किशोरवयीन मुलीची निर्णय क्षमता वाढवण्याच्या दृष्टीकोणातून अनौपाचारिक शिक्षण देण्यासाठी एकात्मीक बालविकास सेवा अंतर्गत शासनाने किशोर शक्ती योजना सुरु केली आहे.

**मातृत्व सहयोग योजना :**

एकात्मीक बालविकास सेवा योजने अंतर्गत गरोदर स्त्रिया आणि स्तनदा माता यांना त्यांच्या गरोदर आणि स्तनपान कालावधीमध्ये बुडीत मजुरीपोटी नुकसान भरपाई म्हणुन रक्कम देऊन त्यांच्या अरोग्य व आहाराच्या दर्जा सुधारण्यासाठी इंदिरागांधी मातृत्व सहयोग योजना सुरु करण्यात आली.

**प्रतिसाद ॲप :**

महिला सुरक्षेच्या दृष्टीने प्रतिसाद ॲप अत्यंत उपयोगी आहे. दहशतवादी हल्ला, अपघात, लुटमार असुरक्षिततेच्या वेळी ज्या ॲपच्या माध्यमातुन क्षणात असूरक्षिततेच्या वेळी ज्या ॲपच्या माध्यामातून क्षणात पोलिसांशी संपर्क होऊन त्वरीत मदत मिळते. महिलांसाठी हेल्पलाईन क्रमांक १०९१ आहे.

**महिलांसाठी असणारे कायदे :**

**हुंडा प्रतिबंध कायदा** :

हुंडा प्रतिबंध कायदा १९६१ च्या कलम ३ नुसार हुंडा घेणा-यास ५ वर्ष सक्त मजुरी आणि रु.१५,०००/- पर्यंत दंडाची शिक्षा आहे. हुंडा मागणी करणे हा देखील गुन्हाह असून ६ महिण्यापर्यंत कैद आणि १०,०००/- दंडाची शिक्षा आहे. कलम ४९८ (अ) नुसार लग्नानंतर १० वर्षापर्यंत विवाहितेला पैसे, चीजवस्तु, सोने यासाठी शारिरीक, मानसिक त्रास देणे गुन्हा आहे. यासाठी १० वर्षापर्यंत सक्तमजुरी व दंडाची शिक्षा होऊ शकते.

१) **वैद्यकिय गर्भपाताचा कायदा :**या कायद्यानुसार महिलांना गर्भपात करण्याचा अधिकार मिळाला आहे. गरोदरपाणाच्या १२ आठवड्या पर्यंत सरकारमान्य गर्भपात केंद्रामध्ये गर्भपात

करता येते कायद्याचे उल्लघन केल्यास गरोदर महिला, हॉस्पीटल, नातेवाईक, एजंट यांच्यावर अजमीनपात्र गुन्हा दाखल होतो. सदर गुन्हासाठी ०७ वर्ष सक्तमजुरी ५०,०००/- रुपयापर्यंत दंडाची शिक्षा होऊ शकते.

२) **अनैतिक व्यापार प्रतिबंधक कायदा :** हा कायदा १९५६ मध्ये पास होऊन यामध्ये २५ हुन अधिक कलम आगर वाहनाचा, वैश्यागृह चालविण्यासाठी करण्यात येणा-या वापराबाबत कमीत कमी १ वर्ष आणि जास्तीत जास्त ३ वर्षाची शिक्षा आणि रु.२०,०००/- पर्यंत दंडाची तरतुद आहे.

**३) कामाच्या ठिकाणी होणारा महिलांच्या लैंगिक छळ प्रतिबंध कायदा (२०१३):** कामाच्या ठिकाणी म्हणजे लैंगिक छळ म्हणजे लगर, शारिरीक संपर्क, लैंगिक शेरेबाजी, पोनोग्राफी दाखवणे, शब्दीक लैंगिक वर्तन या विरोधात कोणत्याही वयाची बाई या विषयी तक्रार करु शकते.

**निष्कर्ष :**

महिलांच्या समस्या आणिह आव्हाने हा विषय फार गंभिरतेने असून आज देखील दिवसाला महिलांवर अन्याय अत्याचार, होत असलेले दिसुन येते. दिल्लीतील निर्भया सारखी घटना असेल किंवा कोपर्डी येथील घटना असेल किंवा नाशिक मधिल छोट्याशा मुलीवर झालेला अत्याचार असेल हे सर्व आजच्या युगात घडत असताना दिसून येते. परंतु या देशात शासन आणि सरकार हे फक्त कायदे तयार करतात आणि अंमलबजावणी मात्र यांच्यामार्फत वेळोवेळी होत नाही म्हणून आज देखील महिलांवर अन्याय हव अत्याचार होताना दिसून येत आहेत.

आजच्या या युगात महिलांना वेग वेगळ्या आव्हांनाना सामोरे जावे लागत आहे. कायदे तर खुप आहेत पण या कायद्यांची अंमलबजावणी त्या प्रमाणे होताना दिसुन येते नाही जर महिलांना संरक्षण द्यावयाचे असेल तर कायदा व समाज या दोघांनी कठोर पाऊले उचलावी लागतील तेव्हाच महिला ह्या आपल्या देशात सुरक्षितता प्राप्त करु शकतात.

**संदर्भ :**

१) सोनाळकर, वंदना 'स्त्री अध्ययनातील सद्यकालीन दृष्टीकोन' औरंगाबाद,२००६
२) ठाकुर.एस.जे. 'समाजशास्त्र अनिवार्य पेपर तिसरा ' निर्मला प्रकाशन नांदेड २००६
३) उज्वला वैरागडे, विघुलता मुळे ' सामुदायिक विकास विस्तार शिक्षण व महिला सबलीकरण (२०१२) विद्याबुक्स, पब्लीशर्स, औरंगाबाद